वातावरण नाहीसे होण्यास मदत होईल.

**मुक्त भातातील कर्तृत्ववान महिला:**

**1. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले:**

सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ मध्ये सातारा जिल्हयातील नायगाव येथे झाला. जोतिबांच्या संकटावर मात करणे, साहसीवृत्ती, दूरदृष्टी, दृढनिश्चयी स्वभाव,माणूसकीचा आचार या गुणांचा सावित्रीबाईंवर मोठा प्रभाव पडला. त्यामुळेच स्त्री शिक्षणाचे काम करण्याचा सावित्रीबाईंनी देखील ध्यास घेतला. जोतिबा फुले यांनी विद्येचे महत्व ओळखले व स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. महात्मा फुले यांनी १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात मुलींची पहिली शाळा सुरू केली. सावित्रीबाईंच्या पूर्वी भारतात एक ही स्त्री शिक्षिका नव्हती किंवा सार्वजनिक काम करणाऱ्या स्त्रियाही नव्हत्या. त्यामुळे सावित्रीबाई या आद्य शिक्षिका होत. सावित्रीबाई यांच्या ज्ञानदान देण्याच्या कामात तत्कालीन समाजाने अनेक अडथळे आणले समाजातील जातीभेद व विषमता या रोगांचे

उच्चाटन करण्याचे विद्या हे रामबाण औषध आहे. हे ओळखुन फुले पति-पत्निने सन १८५१ मध्ये अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली.

**2. झाशीची राणी लक्ष्मीबाई:**

झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांचा जन्म हा १८२८ मध्ये झाला होता. पतीचे निधन झाल्यानंतर राणीलक्ष्मीबाई हया झाशीच्या राणी बनल्या. भातातील पहिल्या स्वातंत्र्य युद्धातील आघाडीच्या योद्धयांमध्ये देखील राणीलक्ष्मीबाई यांचे नाव घेतले जाते. जेव्हा इंग्रज अधिकारी झाशी आपल्या ताब्यात घेण्यासाठी चालून आले तेव्हा आपले लेकरू कडेवर घेत मै मेरी झांशी नही दुंगी असे म्हणत त्यांच्याशी अखेरपर्यंत लढा देणारी कर्तृत्ववान आणि पराक्रमी स्त्री म्हणजे राणी लक्ष्मीबाई होय.

**3. मदर टेरेसा:**

मदर टेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट १९१० रोजी झाला. मदर टेरेसा यांचे खरे नाव अग्रेस गोजा बोयाजुजी असे होते. मदर टेरेसा हया एक थोर मानवतावादी समाजसेविका होत्या त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य गरजू आणि गरीब लोकांची मदत करण्यासाठी बहाल केले. जगावे तर इतरांसाठी हीच अमूल्य शिकवण त्यांनी जगाला दिली. शांततेच्या नोबेल पारितोषिकाच्या त्या मानकरी ठरल्या आहेत.

**4. लता मंगेशकर:**

लता मंगेशकर यांना आपण भारताची गानकोकीळा म्हणुन ओळखतो. ज्यांनी विविध भाषेमध्ये गायन करुन लाखो, करोडो लोकांच्या हृदयावर राज्य केले. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ मध्ये मध्यप्रदेश मधील इंदुर येथे एका गायक घराण्यात झाला. मराठी रंगभूमिवरील प्रसिध्द गायक आणि नट दिनानाथ मंगेशकर यांच्या त्या जेष्ठ कन्या होत्या. लताजींना कुटुंबामध्येच संगीताचे शिक्षण मिळाले लतादीदी तेरा वर्षाच्या असतांनाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले आणि संपूर्ण कुटुंबाची

जबाबदारी तेरा वर्षाच्या लताजींवर येऊन पडली. लताजींचे भावंड म्हणजे आशा, उषा, मीना आणि भाऊ हृदयनाथ मंगेशकर हे होत. लताजींनी हिंदी सोबतच अनेक भारतीय भाषेमध्ये गायन केले. त्यांना भारतातील सर्वोच्च पुरस्कार 'भारतरत्न' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

**5. आनंदीबाई जोशी:**

आनंदीबाई गोपाळ जोशी यांनी आपल्या प्रबळ इच्छा शक्ती आणि दृढ संकल्पाच्या बळावर ज्या काळात स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देखील प्राप्त होणे कठीण होते. त्याकाळात आनंदीबाई गोपाळ जोशी यांनी परेदशात जाऊन आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि भारतातील पहिली महिला डॉक्टर होण्याचा बहुमान त्यांनी प्राप्त केला.

**6. सिंधूताई सपकाळ:**

सिंधूताई सपकाळ यांना अनाथांची माय म्हणून ओळखले जाते. आई-वडिलांच्या प्रेमापासून वंचित असलेल्या लाखो असंख्य मुला-मुलींना आईची माया देण्याचे प्रेरणादायी काम सिंधूताई सपकाळ यांनी केले आहे. भारतातील अनेक अनाथ मुलांचे पालन पोषण त्यांनी स्वतःच्या मुलाप्रमाणे केले. सिंधूताईंचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ मध्ये वर्धा येथे झाला. त्यांचा मृत्यु ४ जानेवारी १९२२ रोजी झाला.

**7. कल्पना चावला:**

कल्पना चावला यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरियाणाच्या कर्नालमध्ये झाला. तेथेच त्यांचे बालपण गेल. कल्पना चावला या आंतराळात भरारी घेणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या. १९७६ मध्ये कर्नाल टागोर स्कुल मधून त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केल. तर १९८२ साली पंजाब इंजिनिअरिंग कॉलेज मधून वैमानिक इंजिनिअरिंग (Aeronautical Engineering) मध्ये पदवी घेतली. १९८४ मध्ये टेक्सास विद्यापीठातून वैमानिक इंजिनीअरिंगमध्ये त्यांनी पद्व्युत्तर पदवी पूर्ण केली. नासा हया जगप्रसिध्द संशोधन संस्थेने कोलंबिया नावाचे यान आंतराळाचा अभ्यास करण्यासाठी १५ दिवस पाठवण्यात आले होते. त्यात कल्पना चावला यांचा समावेश होता. 'एसटीएस १०७' नावाच्या हया मोहिमेसाठी सात आंतराळवीरांची रवाणगी करण्यात आलेली होती आणि या सात आंतराळवीरांत एका भारतीय तरुण मुलीचा देखील समावेश होता. त्या मुलीचे नाव होते कल्पना चावला. १ फेब्रुवारी २००३ ला कोलंबिया अंतराळ यानाने पृथ्वीकडे येण्यासाठी अमेरिकेच्या पॅसिफिक समुद्राकड झेप घेतली. अंतराळवीरांनी स्पेस सुट घातला. त्यावेळी सर्व योग्यरीत्या सुरु होते. त्यावेळी स्थानिक वेळेनुसार सकाळच्या ८:४० वाजता कोलंबिया यानान पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश केला. २२ मिनिटात ते यान पृथ्वीवर उतरणार होत. ८;५४ वाजता यानाचा आणि नियंत्रण कक्षाचा संपर्क तुटायला सुरुवात झाली. ९:१६ वाजता काही गोष्टी स्पष्ट व्हायला लागल्या आणि कोलंबिया यान इतिहासात जमा झाल.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

तेव्हा कोलंबिया स्पेस शटलचा अपघात झाला आणि त्यातच सगळया आंतराळवीरांच निधन झाल.

**8. पी. टी. उषा:**

पी टी उषा यांना आपण भारताची सुवर्णकन्या म्हणून ओळखतो. पी टी उषा यांनी धावण्याच्या शर्यतीमध्ये महिला धावपटुंमध्ये विक्रमी कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले होते. उषा यांचा जन्म २७ जून १९६४ मध्ये केरळच्या कोजिकोड जिल्हयातील पय्योली गावात झाला. पी टी उषा यांनी आतापर्यंत १०१ आंतरराष्ट्रीय पदके जिंकली आहेत. त्या दक्षिण रेल्वेमध्ये अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. १९८५ मध्ये त्यांना पद्मश्री आणि अर्जुन पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. अशा प्रकारे मुक्त भारतात अनेक कर्तृत्ववान महिला होऊन गेल्या. ज्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात योगदान देऊन आपल्या कार्याचा ठसा उमटवला. या कर्तृत्ववान महिलांच्या कार्याची दखल देशाने व जगाने घेतली.

*Cite This Article:*

** **प्रा. पाटील म.** (2023). मुक्त भारताच्या कर्तृत्ववान महिला,* ***Educreator Research Journal, Volume–X, Issue– II****, March –April 2023, 38-41.*